Dainik bandhuta

https://youtu.be/QslfnicG7oI?si=ydX9oedE9gJPrscC

sangli vrutta vedh

https://youtu.be/ed7X6KV3ciM

mahasatta news

https://mahasattanews.com/?p=1804

SBNmarathi news

https://youtu.be/kWGhcBvCRS4

दैनिक बंधुता
पश्चिम महाराष्ट्रातील अग्रगण्य
• सांगली • रत्नागिरी • सोलापूर
• Postal Reg. No. SGL/109/2025-2027

# तंत्रशिक्षण शिक्षणासाठी एक हजार विद्यार्थी जपानला पाठवणार

## जपान मधील सहा विद्यापीठांच्या सोबत करार होणार : उच्चतंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील

**बंधुता न्यूज नेटवर्क**

मिरज : तंत्रज्ञानामुळे भारत समृद्ध होत असून ज्ञानाच्यावर आपण जगावर राज्य करणार आहोत. तंत्रशिक्षण विभागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी जपान मधील सहा विद्यापीठांच्या सोबत करार केला जाणार असून, तंत्रशिक्षणासाठी पहिल्या टप्प्यात भारतातील एक हजार विद्यार्थ्यांना जपानमध्ये शिक्षणासाठी पाठवले जाणार आहे अशी माहिती, उच्चतंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील यांनी दिली. सांगली जिल्ह्यातील मिरज येथील तंत्रशिक्षण महाविद्यालयात अत्याधुनिक डिजिटल सुविधा व ८० केवी क्षमतेच्या पारेषण संलग्न सौर ऊर्जा प्रकल्पाचे उदघाटन मंत्री चंद्रकांत दादा पाटील यांच्या हस्ते करण्यात आलेले याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी खासदार विशाल पाटील आणि आमदार इद्रिस नायकवडी, जिल्हाधिकारी अशोक काकडे, प्राचार्य डॉ. संजय परदेशी यांच्या समवेत प्राध्यापक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली आखण्यात आलेल्या नवीन शैक्षणिक धोरण अंमलबजावणी करण्यामध्ये महाराष्ट्र देशात प्रथम क्रमांकच राज्य ठरल आहे, असे सांगून मंत्री चंद्रकांत दादा पाटील पुढे म्हणाले, केंद्राच्या धोरणाची अंमलबजावणी न करण्याचं काही राज्य सरकारने ठरवलं होतं त्यामुळे, महाराष्ट्रात त्यावेळी असणाऱ्या सरकारच्या चुकीच्या निर्णयामुळे २०२२ च्या अगोदर शैक्षणिक क्षेत्राची हानी झाली होती. मात्र पुन्हा आपले सरकार असल्या नंतर, शिक्षण क्षेत्रात मोठी प्रगती सुरू झाली. स्किल डेव्हलपमेंट शिक्षणाचं जगात महत्व वाढत चाललेले, आणि शासनाने घेतलेल्या योग्य निर्णयाच्यामुळे, अत्याधुनिक पद्धतीच्या तंत्रशिक्षणा मध्ये राज्य आघाडीवर आहे, असे ना.चंद्रकांत पाटील यांनी यावेळी सांगितलं.

**माजी पालकमंत्री सुरेश भाऊ खाडे यांची या कार्यक्रमास असलेली अनुपस्थिती चर्चेचा विषय ठरला. एकीकडे पालकमंत्री चंद्रकांत दादा पाटील हे विविध कार्यक्रमांना उपस्थित राहून उदघाटने करत होते. मात्र त्याचवेळी माजी पालकमंत्री सुरेश भाऊ खाडे यांनी मिरज मतदारसंघातील कार्यकर्त्यांच्या बरोबर तातडीची बैठक घेऊन मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रातील पूरग्रस्त लोकांना मदत देण्यासाठी निधी उपलब्ध करून देत होते.**





**महाभारताच्या वेळी इंटरनेट होतं, त्यामुळेच संजय हा दूरवरची घटना धृतराष्ट्र यांना सांगत होता. आत्ताचा राजकारणातला संजय सुद्धा स्वतःला त्या वेळेचा संजय समजून रोज सकाळी बडबडत असतो, असही पालकमंत्री चंद्रकांत दादा पाटील यांनी यावेळी सांगितलं.**

# तंत्रशिक्षण विद्यार्थ्यांसाठी जपानशी करार करणार

## उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील : मिरज शासकीय पॉलिटेक्निकमध्ये कार्यक्रम

**मिरज : पुढारी वृत्तसेवा**

तंत्रज्ञानामुळे भारत समृद्ध होत असून ज्ञानावर आपण जगावर राज्य करणार आहोत. तंत्रशिक्षण विभागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी जपानमधील सहा विद्यापीठांच्या सोबत करार केला जाणार असून, तंत्रशिक्षणासाठी पहिल्या टप्प्यात भारतातील एक हजार विद्यार्थ्यांना जपानमध्ये शिक्षणासाठी पाठवले जाणार आहे, अशी माहिती उच्च तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी गुरुवारी दिली.



**मिरज : शासकीय पॉलिटेक्निकमध्ये विद्यार्थ्यांकडून डिजिटल सुविधांबाबत माहिती घेताना पालकमंत्री चंद्रकांत पाटील.** (छाया : जालिंदर हुलवान)

मिरज येथील शासकीय तंत्र शिक्षण महाविद्यालयात अत्याधुनिक डिजिटल सुविधा व ८० केव्ही क्षमतेच्या पारेषण संलग्न सौरऊर्जा प्रकल्पाचे उद्घाटन मंत्री पाटील यांच्याहस्ते झाले. यावेळी ते बोलत होते. खासदार विशाल पाटील, आ. इद्रिस नायकवडी, जिल्हाधिकारी अशोक काकडे, महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते.

मंत्री पाटील म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली आखण्यात आलेल्या नवीन शैक्षणिक धोरण अंमलबजावणी करण्यामध्ये महाराष्ट्र देशात प्रथम क्रमांकाचे राज्य ठरले आहे. केंद्राच्या धोरणाची अंमलबजावणी न करण्याचे काही राज्य सरकारने ठरवले होते. त्यामुळे महाराष्ट्रात त्यावेळी असणाऱ्या सरकारच्या चुकीच्या निर्णयामुळे २०२२ च्या अगोदर शैक्षणिक क्षेत्राची हानी झाली होती. मात्र पुन्हा आमचे सरकार असल्यानंतर, शिक्षण क्षेत्रात मोठी प्रगती सुरू झाली. स्किल डेव्हलपमेंट शिक्षणाचे जगात महत्त्व वाढत चाललेले आणि शासनाने घेतलेल्या योग्य निर्णयाच्यामुळे, अत्याधुनिक पद्धतीच्या तंत्रशिक्षणामध्ये राज्य आघाडीवर आहे, असेही मंत्री पाटील म्हणाले.

### आजचा संजय, स्वतःला महाभारतातला संजय समजतो...

**या कार्यक्रमात पालकमंत्री पाटील यांनी संजय राऊत आणि उद्धव ठाकरे यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या कार्यकाळाबाबत टीका केली. ते म्हणाले, महाआघाडीच्या सरकारच्या कालावधीमध्ये शिक्षण विभागाचे मोठे नुकसान झाले. महाभारतावेळीदेखील वेगळे इंटरनेट होते, त्यामुळेच संजय हा दूरवरची घटना धृतराष्ट्र यांना सांगत होता. आताचा राजकारणातला संजयसुद्धा स्वतःला त्या वेळेचा संजय समजून रोज सकाळी बडबडत असतो.**